चंद्रपूरसह राज्यातील बंद पाणीपुरवठा योजना पुन्हा सुरू करण्यासाठी शासनाचा महत्त्वपूर्ण निर्णय; आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या मागणीला ऊर्जा विभागाची कार्यवाही!

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदन ; मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्याशी दूरध्वनीवरून केली होती चर्चा

२५ सप्टेंबरला जिल्हाधिकारी वसुमना पंत यांच्यासोबत बैठक घेऊन बंद योजनांचा घेतला होता आढावा; १९० गावांतील १ लाख ७५ हजार नागरिकांना मिळणार दिलासा

चंद्रपूर - दुष्काळसदृश परिस्थितीत ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागू नये आणि थकीत वीजबिलांमुळे बंद पडलेल्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजना पुन्हा सुरू व्हाव्यात, यासाठी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी शासनाकडे केलेल्या मागणीला महत्त्वपूर्ण प्रतिसाद मिळाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना निवेदन देऊन तसेच मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून त्यांनी हा प्रश्न शासनाच्या निदर्शनास आणून दिला होता. यासोबतच २५ सप्टेंबर रोजी चंद्रपूरच्या जिल्हाधिकारी वसुमना पंत यांच्यासोबत बैठक घेऊन बंद पाणीपुरवठा योजनांचा सविस्तर आढावा घेतला होता. या मागणीच्या अनुषंगाने राज्याच्या ऊर्जा विभागाने ३० ऑक्टोबर २०२६ रोजी शासन निर्णय निर्गमित करून थकबाकीमुळे खंडित झालेल्या सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांचा वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी विशेष तरतुदी केल्या आहेत. या निर्णयामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील बंद असलेल्या १३ प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांसह राज्यातील पाणीपुरवठा योजनांना पुन्हा सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात जिल्हा परिषद व शिखर समितीमार्फत एकूण ३३ प्रादेशिक पाणीपुरवठा योजना चालविल्या जातात. त्यापैकी २० योजनांद्वारे सध्या पाणीपुरवठा सुरू असून, उर्वरित १३ योजना सुमारे ४ कोटी ९२ लाख ६८ हजार रुपयांची वीजदेयके थकीत असल्यामुळे बंद आहेत. या योजनांवर जिल्ह्यातील सुमारे १९० गावांमधील १ लाख ७५ हजार नागरिक अवलंबून आहेत. दुष्काळसदृश परिस्थितीत पाण्याचे स्रोत आटत असताना वीजपुरवठा खंडित झाल्याने या गावांतील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर झाला होता.या पार्श्वभूमीवर २५ सप्टेंबर रोजी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी जिल्हाधिकारी वसुमना पंत यांच्यासोबत बैठक घेऊन थकीत वीजबिलांमुळे बंद पडलेल्या ग्रामीण पाणीपुरवठा योजनांचा सविस्तर आढावा घेतला. ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत सुविधेपासून वंचित राहावे लागू नये, यासाठी या योजना तातडीने सुरू करण्याच्या दृष्टीने आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबत त्यांनी जिल्हा प्रशासनाचे लक्ष

वेधले. थकीत वीजदेयकांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या स्तरावरही समन्वयाने कार्यवाही व्हावी, अशी भूमिका आ.मुनगंटीवार यांनी मांडली होती.

यानंतर आ. सुधीर मुनगंटीवार यांनी थकीत वीजदेयके दुष्काळ निवारण अथवा पाणीटंचाई निधीतून अदा करण्याची तसेच बंद पाणीपुरवठा योजना तातडीने सुरू करण्याची मागणी शासनाकडे केली. सन २०१८ मधील दुष्काळजन्य परिस्थितीत ग्रामीण नळ पाणीपुरवठा योजनांची विद्युत देयके टंचाई निधीतून अदा करण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचाही आ.मुनगंटीवार यांनी संदर्भ दिला होता. त्याच धर्तीवर सध्याच्या परिस्थितीतही शासनाने विशेष निर्णय घ्यावा, अशी त्यांची आग्रही भूमिका होती.

ऊर्जा विभागाच्या शासन निर्णयानुसार, थकीत वीजबिलांमुळे बंद पडलेल्या सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांचा वीजपुरवठा एका महिन्याच्या वीजदेयकाची सुरक्षा ठेव व पुनर्जोडणी शुल्क भरल्यानंतर पूर्ववत करण्यात येणार आहे. तसेच थकबाकीमुळे प्रलंबित असलेल्या नवीन वीजजोडण्याही नियमानुसार आवश्यक शुल्क भरल्यानंतर देण्यात येणार आहेत. सुरक्षा ठेव व पुनर्जोडणी शुल्कासाठी जिल्हा नियोजन समितीचा निधी (DPDC), टंचाई निधी किंवा अन्य उपलब्ध निधी वापरण्याची मुभा देण्यात आली आहे.

ग्रामीण जनतेच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न केवळ स्थानिक प्रशासनापुरता मर्यादित न ठेवता आ. सुधीर मुनगंटीवार यांनी जिल्हा प्रशासनापासून शासनाच्या सर्वोच्च स्तरापर्यंत सातत्याने मांडला. जिल्हाधिकाऱ्यांसोबतची बैठक, मुख्यमंत्र्यांकडे केलेले निवेदन आणि मुख्य सचिवांशी झालेली चर्चा या सर्व स्तरांवरील प्रयत्नांनंतर ऊर्जा विभागाने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. विशेषतः चंद्रपूर जिल्ह्यातील १३ बंद पाणीपुरवठा योजनांमुळे अडचणीत आलेल्या १९० गावांतील सुमारे १ लाख ७५ हजार नागरिकांना या निर्णयामुळे दिलासा मिळणार आहे. आर्थिक थकबाकीच्या कारणास्तव ग्रामीण जनतेला पिण्याच्या पाण्यासारख्या अत्यावश्यक सुविधेपासून वंचित राहावे लागू नये, हीच भूमिका घेत आ. मुनगंटीवार यांनी हा प्रश्न सातत्याने लावून धरला होता. आता शासन निर्णयानुसार आवश्यक कार्यवाही पूर्ण करून या योजना लवकरात लवकर सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

7722074199
Sudhir.Mungantiwar
sudhir.mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com
bjp03069@gmail.com

महाराष्ट्र विधानसभा

सुधीर मुनगंटीवार
विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

जावक क्रमांक : 906 /ऑक्टोबर/२०२६ दिनांक : १३/१०/२०२६

प्रति,

मा.ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस,
मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

वंदे मातरम् !

विषय : चंद्रपूर जिल्ह्यातील थकीत वीजबिलांमुळे बंद असलेल्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजना तातडीने सुरू करून दुष्काळसदृश परिस्थितीत ग्रामीण भागातील पाणीपुरवठा सुरळीत करण्याबाबत.

संदर्भ : महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. टंचाई 2018/प्र.क्र.246/म-7, दि. 11.12.2018.

महोदय,

चंद्रपूर जिल्ह्यात सध्या निर्माण झालेली दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेता ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची उपलब्धता करून देणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र, जिल्ह्यातील प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांची वीजदेयके थकीत असल्यामुळे अनेक योजनांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला असून, परिणामी संबंधित गावांतील नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.

प्राप्त माहितीनुसार, चंद्रपूर जिल्ह्यात जिल्हा परिषद व शिखर समितीमार्फत एकूण 33 प्रादेशिक पाणीपुरवठा योजना चालविण्यात येतात. त्यापैकी 20 योजनांद्वारे पाणीपुरवठा सुरू असून, 13 योजना वीजबिल थकीत असल्यामुळे बंद आहेत. या योजनांची एकूण प्रलंबित वीजदेयक रक्कम सुमारे 4 कोटी 92 लाख 68 हजार रुपये आहे. या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांवर जिल्ह्यातील सुमारे 190 गावांमधील 1 लाख 75 हजार नागरिक अवलंबून आहेत.

एकीकडे दुष्काळसदृश परिस्थितीमुळे पाण्याचे स्रोत आटत असताना, दुसरीकडे वीजबिल थकीत असल्याने पाणीपुरवठा योजना बंद राहणे ही ग्रामीण जनतेसाठी अत्यंत गंभीर बाब आहे. नागरिकांना पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत सुविधेपासून वंचित राहावे लागू नये, यासाठी तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे.

सन 2018 मधील दुष्काळजन्य परिस्थितीत ग्रामीण नळ पाणीपुरवठा योजनांची विद्युत देयके टंचाई निधीतून अदा करण्याबाबत शासनाने निर्देश दिले होते. याच धर्तीवर सध्याच्या दुष्काळसदृश परिस्थितीचा विचार करून चंद्रपूर जिल्ह्यातील थकीत वीजबिलांचा प्रश्न तातडीने मार्गी लावणे आवश्यक आहे.

॥ वृक्ष लावा, वृक्ष जगवा ॥
पत्ता : 'भाग्यश्री' गोल बाजार वार्ड, चंद्रपूर (महाराष्ट्र) दूरध्वनी क्र.07172-252582 (O), 256069 (H) 9552799608 (W)

महाराष्ट्र विधानसभा

सुधीर मुनगंटीवार
विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

7722074199
Sudhir.Mungantiwar
sudhir.mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com
bjp03069@gmail.com

9016-1

जावक क्रमांक :

दिनांक :

1. चंद्रपूर जिल्ह्यातील थकीत वीजबिलांमुळे बंद असलेल्या सर्व 13 प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांचा वीजपुरवठा तातडीने पूर्ववत करून पाणीपुरवठा सुरू करण्याबाबत महावितरण कंपनीला निर्देश द्यावेत.

2. सदर योजनांची प्रलंबित वीजदेयके दुष्काळ निवारण तथा टंचाई निधीतून अदा करण्याबाबत आवश्यक शासन निर्णय निर्गमित करावा.

3. दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेता ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजनांची वीजबिलांअभावी वीजजोडणी खंडित करण्यात येऊ नये, यासाठी आवश्यक निर्देश द्यावेत.

4. ग्रामीण भागातील नागरिकांना नियमित व पुरेसा पाणीपुरवठा होण्यासाठी संबंधित विभागांमध्ये समन्वय साधून तातडीने कार्यवाही करावी.

दुष्काळाच्या या कठीण काळात नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागू नये, यासाठी या विषयाला सर्वोच्च प्राधान्य देऊन तातडीने निर्णय घ्यावा, ही विनंती.

कार्यवाहीची रूपरेषा कळविल्यास मी आपला आभारी राहील.

धन्यवाद।

आपला,

(सुधीर मुनगंटीवार)

प्रत :

1. **मा. जिल्हाधिकारी चंद्रपूर**
2. **मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. चंद्रपूर**
3. **मा. मुख्य अभियंता वि.वि.क.मर्या.चंद्रपूर**
4. **मा. कार्यकारी अभियंता ग्रा.पाणीपुरवठा विभाग जि.प.चंद्रपूर**
5. **मा. कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जिवन प्राधीकरण दाताळा रोड चंद्रपूर**
6. **श्री.बंडू गौरकार सदस्य महाराष्ट्र राज्य कृषीमुल्य आयोग मुंबई**
7. **श्री .चंदु मारगोनवार तालुका अध्यक्ष भारतीय जनता पार्टी मुल**
8. **श्री .हरीश ढवस तालुका अध्यक्ष भारतीय जनता पार्टी पोभुर्णा**
9. **श्री .श्रीनिवास जंगमवार तालुका अध्यक्ष भारतीय जनता पार्टी चंद्रपूर**
10. **श्री.चंद्रकांत देऊळकर तालुका अध्यक्ष भारतीय जनता पार्टी बल्लारपुर**